# गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम

## योजनेचे स्वरुप व कार्यपध्दती :

- राज्यातील अपूर्ण पाणलोट धडक स्वरुपात पूर्ण करण्याचे उद्देशाने सन २००७-०८ पासून गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यात येतो. जलसंधारण विभागाचे दिनांक ३०/११/२००७ च्या शासन निर्णयानुसार सदरची योजना सुरु झाली असून त्यामध्ये ५०० ते १००० हेक्टर क्षेत्राचा व किमान ५० टक्के पूर्ण असलेले सुक्ष्म पाणलोट निवडून नियोजनबध्द पध्दतीने १ वर्षाचे कालावधीत पूर्ण करण्यात येतो.
- **पाणलोटात घ्यावयाची कामे** :
  १) **क्षेत्र उपचाराची कामे** : सलग समतल चर, ढाळीचे बांध, कंम्पार्टमेंट बंडीग, मजगी, शेततळे इत्यादी .
  २) **नाला उपचाराची कामे** : माती नालाबांध, सिमेंट नालाबांध, वळण बंधारे इत्यादी.

योजनेमध्ये निवडलेल्या पाणलोटांना प्रकल्पाधारीत पध्दतीने डीपीडीसी सर्वसाधारण, टिएसपी, राज्यस्तर, ओटिएसपी व विशेष घटक योजनेतून निधी खर्च करण्यात येतो. कार्यक्रमाचा आढावा व संनियंत्रणासाठी आयुक्त (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती गठीत असून समितीच्या मार्गदर्शन व निर्णयानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.